# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ५२/२०२३ दिनांक :- १४/०२/२०२३

## पत्नीची निर्घृण हत्या करणा-या पतीस मध्यप्रदेश येथून अवघ्या काही तासात अटक करुन गुन्हयाची उकल.
## गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनिटची कामगिरी.

तुळींज पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये ईसम नामे श्री. संजीव रामस्वरुप ठाकुर, वय ५२ वर्ष, व्यवसाय रिअल इस्टेट एजंट, रा.ठि. रुम नंबर.८, अभिमान सोसायटी चाळ, त्रिंबक बंगल्याचे जवळ, तुळींज नाका, नालासोपारा पूर्व यांनी दिनांक १३/०२/२०२३ रोजी सायंकाळी १७.०० वाजताचे पूर्वी सिता सदन अपार्टमेंट, रुम नंबर २०४, तुळींज रिक्षा स्टँड, जिल्हा परीषद मराठी शाळेजवळ, नालासोपारा पूर्व या ठिकाणी मयत महीला नामे मेघा हार्दीक शाह उर्फ मेघा धनसिंग तोरवी, वय अंदाजे ४० वर्ष, रा.ठि. सिता सदन अपार्टमेंट, रुम नंबर २०४, तुळींज रिक्षास्टँड, जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, नालासोपारा पूर्व हीचा तिचा पती गुन्हयातील आरोपीत हार्दीक राजुभाई शहा याने काही दिवसांपूर्वी कोणत्यातरी अज्ञात कारणाने खुन करुन तिचे प्रेत घरातील बेडमध्ये लपवुन तसेच घरातील सर्वसामान विक्री करुन रुमला बाहेरुन कुलुप लावुन कोठेतरी निघुन गेल्याबाबत फिर्याद दिल्यावरुन दिनांक १३/०२/२०२३ रोजी २३.१५ वाजता तुळींज पो. ठाणेत गु.रजी.नं. १२८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून नमूद खुनाच्या गुन्हयातील आरोपी हार्दीक राजुभाई शहा आस अटक करण्याकरीता वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनिटचे प्रमुख श्री. शाहुराज रणवरे, पोलीस निरीक्षक यांनी वेगवेगळी तपास पथके तयार करुन आरोपीताचा शोध घेतला. तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपी हा पश्चिम एक्सप्रेस या गाडीने प्रवास करीत असल्याची माहीती प्राप्त झाल्याने मिळालेल्या माहीती व तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपीतास तात्काळ ताब्यात घेणेकरीता नागदा रेल्वे पोलीस बलाशी समन्वय साधुन आरोपीत नामे हार्दीक राजुभाई शहा यास नागदा जंक्शन, मध्यप्रदेश येथून ताब्यात घेण्यात आले. त्यास विश्वासात घेवून गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यास कोणताही कामधंदा नसून घरात खर्च होणारे पैशाबाबत त्याचे पत्नीशी वारंवार वाद होत असल्याने त्याने कंटाळुन पत्नी मेघा हीचा गळा आवळून खून केल्याचे निष्पन्न झाले. म्हणून नमूद आरोपीतास वर नमूद अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सहा.फौज.संजय नवले, रमेश भोसले, पो.हवा. चंदन मोरे, रमेश अलदर, जगदिश गोवारी, सचिन पाटील, सुधीर नरळे, पो.ना.प्रशांत ठाकुर, पो.कॉ. १२०९७ अमोल कोरे सर्व नेम. गुन्हे शाखा २ वसई, पो.अंम.राऊत, सहा.फौज. संतोष चव्हाण, नेम.सायबर गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक. श्री पांडे आणि महीला पोलीस उप निरीक्षक श्रीमती स्मिता सोमकुवर नेम. नागदा रेल्वे पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

---ooo---